आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१७ नोव्हेंबर २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नायजेरियामधे हृद्य स्वागत/ राष्ट्रप्रमुखांशी चर्चा केल्यावर स्वीकारणार नायजेरियाचा सर्वोच्च सन्मान

- महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात येत्या बुधवारी मतदान

- इस्रायली सैन्य लेबनॉनची हद्द ओलांडून ५ किलोमीटर अंतर्भागात/ इस्राएल वरच्या ५ ड्रोन हल्ल्यांची जबाबदारी इराकमधल्या इस्लामिक रेझिस्टन्स, शिया पंथी गटानं स्वीकारली

- इफ्फी, चित्रपट महोत्सवाच्या आंतरराष्ट्रीय परीक्षक पटलाचे अध्यक्ष म्हणून दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती

**आणि**

- महिलांच्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारताचा सामना आज जपान बरोबर

**<><><><><>**

तीन देशांच्या दौऱ्यामधे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नायजेरियामधे पोहचले असून तिथल्या भारतीय समुदायाने त्यांचं जल्लोषात स्वागत केलं. मोदी यांनी भारतीय समुदायाशी संवाद साधला. नायजेरियात राहणाऱ्या मराठी भाषक समुदायानं आपल्या मुळांशी आणि मातीशी नातं जपलं असल्याबद्दल मोदी यांनी या समुदायाचं कौतुक केलं. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर मराठी समुदायाने आनंद व्यक्त केल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष बोला अहमद तिनुबू यांच्याशी ते आज चर्चा करतील. या बैठकीत दोन्ही देशांदरम्यानच्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेण्यात येईल आणि द्विपक्षीय संबंध वाढवण्याबाबत चर्चा होईल. या चर्चेनंतर अनेक करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची अपेक्षा आहे. दि ग्रँड कमांडर ऑफ ऑर्डर ऑफ दि नायजर हा नायजेरियातला सर्वोच्च सन्मान

प्रधानमंत्री मोदी यांना प्रदान करण्यात येणार आहे. इतर देशांकडून मोदी यांना मिळणारा हा १७वा सन्मान आहे. नायजेरियानंतर प्रधानमंत्री ब्राझिल आणि गयाना देशांना भेट देणार आहेत.

G ट्वेंटी शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी उद्या ते दोन दिवसांच्या ब्राझीलच्या दौऱ्यावर असतील तर तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात ते गयानाला जातील.

**<><><><><>**

'एक पेड माँ के नाम' या उपक्रमामध्ये सहभागी होऊन त्याला गती देणाऱ्या सर्वांचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आभार मानले आहेत. जास्तीत जास्त नागरिकांनी आपापल्या आईच्या सन्मानार्थ एक झाड लावावं आणि शाश्वत ग्रहासाठी योगदान द्यावं असं आवाहन एका समाज माध्यमावरच्या संदेशात मोदींनी केलं आहे.

**<><><><><>**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने भारताच्या दूर पल्ल्याच्या पहिल्यावहिल्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची काल उड्डाण चाचणी घेतली. ओदिशातल्या ए पी जे अब्दुल कलाम बेटावरुन या क्षेपणास्त्राने यशस्वी उड्डाण केलं. सशस्त्र दलांसाठी पंधराशे किलोमीटरपेक्षा दूर पल्ल्याचं विविध पेलोड घेऊन जाण्याची क्षमता या क्षेपणास्त्राकडे आहे. या यशाबद्दल संरक्षण संशोधन आणि विकास संस्था म्हणजेच DRDO, तसंच लष्कर आणि संरक्षण सामुग्री उत्पादन उद्योगांचं, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी अभिनंदन केलं आहे. "हे ऐतिहासिक यश असून, अशा प्रकारच्या गुंतागुतीच्या आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची क्षमता बाळगणाऱ्या मोजक्या देशांमध्ये आता भारताची गणना होत आहे", असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांचा प्रचार अखेरच्या टप्प्यात आला आहे. केंद्रीय मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज नागपूर इथं वार्ताहर परिषद घेतली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात रोड शो केला. त्यानंतर ते आज दुपारी चांदवड आणि संध्याकाळी कोल्हापुरात इचलकरंजी इथे जाहीर सभा घेणार आहेत.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१७ नोव्हेंबर २०२४ - रविवार

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे आज नागपुरात उमरेड इथे जाहीर सभा घेत आहेत. महाविकास आघाडीची प्रचाराची समारोपाची जाहीर सभा आज मुंबई इथे होणार आहे. या सभेसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह सर्व प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. भाजपाचे तीन केंद्रीय मंत्री आणि गुजरातच्या मुख्यमंत्र्यासह अनेक वरिष्ठ नेते प्रचारासाठी मुंबईत दाखल झाले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे मुंबईत भांडूप इथे जाहीर सभा घेणार आहेत.

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांची आज दुपारी पुण्यात प्रचार सभा होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची उद्या मुंबईत प्रचार सभा होणार आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला सर्वांनी मतदान करावं असं आवाहन अभिनेते मकरंद देशपांडे यांनी केलं आहे......

**होल्ड बाईट....**

**<><><><><>**

तेलंगणामधल्या मुसी पुनरुज्जीवन प्रकल्पाला विरोध म्हणून भाजपाने काल 'मुसी निद्रा' आंदोलन केलं. भाजपा नेत्यांनी या आंदोलना अंतर्गत मुसी नदी परिसरातल्या गरीब कुटुंबासोबत एक रात्र मुक्काम केला. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष किशन रेड्डी यांनी सिकंदराबाद लोकसभा मतदारसंघातल्या तुलसीराम नगर इथल्या कुटुंबासोबत मुक्काम केला. राज्य सरकार मुसी नदी परिसरातली गरीबांची घरं विस्थापित करण्याची योजना आखत आहे, मात्र भाजपा इथल्या रहिवाश्यांच्या सोबत आहे, असं रेड्डी म्हणाले.

**<><><><><>**

इस्रायली सैन्याने काल लेबनॉनवर हल्ला करून चामा गावातली एक मोक्याची जागा ताब्यात घेतली. ही जागा सीमेपासून अंदाजे पाच किलोमीटर आत आहे. लेबनॉनने इस्रायली सैन्यावर शिमॉन प्रेषिताचं मंदिर आणि चामा गावातल्या अनेक घरांवर हल्ला केल्याचा दावा केला आहे. इस्रायलच्या लढाऊ विमानांनी बैरुतच्या दक्षिणेकडच्या उपनगरांर बॉम्ब हल्ले केले. या हल्ल्यात सहा जण ठार झाल्याची माहिती

लेबनॉनच्या माध्यमांनी दिली आहे. लेबनॉनच्या सीमेजवळ असणाऱ्या इस्रायली नागरिकांना वाचवण्यासाठी हा हल्ला केल्याचं इस्रायली सूत्रांचं म्हणणं आहे.

**<><><><>**

इराकमधल्या इस्लामिक रेझिस्टन्स, या शिया मिलिशिया गटानं आज दक्षिण आणि उत्तर इस्रायलमध्ये करण्यात आलेल्या पाच ड्रोन हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली आहे. दक्षिण इस्रायलमधे इलात बंदरातली चार महत्त्वाची ठिकाणं आणि लष्करी छावण्या तसंच उत्तर इस्रायलमधल्या एका लष्करी छावणीवर हा हल्ला केल्याचं या गटानं प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे. या हल्ल्यांमधे जीवितहानीचं वृत्त नाही. पॅलेस्टाईन आणि लेबनॉनच्या नागरिकांना पाठिंबा दर्शवण्यासाठी हल्ले केल्याचं या निवेदनात म्हटलं आहे. गेल्या वर्षी ७ ऑक्टोबरला गाझा पट्टीमध्ये इस्रायली-पॅलेस्टिनी संघर्षाचा उद्रेक झाल्यापासून, इराकमधील इस्लामिक रेझिस्टन्स या गटानं गाझामधील पॅलेस्टिनींना पाठिंबा दर्शवण्यासाठी इस्रायल आणि इस्राइलमधील अमेरिकेच्या विविध ठिकाणांवर  वारंवार हल्ले केले आहेत.

**<><><><>**

श्रीलंकेत उद्या राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांच्या उपस्थितीत नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी होणार आहे. राष्ट्रपतींकडून २३ सदस्यीय मंत्रीमंडळाची नियुक्ती केली जाण्याची  शक्यता आहे. डॉ. हरिणी अमरसूर्या प्रधानमंत्री पदाचा तर विजिता हेराथ परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचा कार्यभार स्विकारतील. संरक्षण आणि अर्थ मंत्रालयाचा कारभार राष्ट्रपती आपल्याकडेच राखून ठेवतील अशी शक्यता आहे.

**<><><><>**

इंडो-पॅसिफिक प्रदेशात सागरी क्षेत्रात निगराणी ठेवायला भारताला मदत करण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत असं ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिकेने आज स्पष्ट केलं. ऑस्ट्रेलियामधल्या डार्विन इथं ऑस्ट्रेलियाचे उपप्रधानमंत्री रिचर्ड मार्ल्स, जपानचे संरक्षण मंत्री नाकातनी जेन आणि अमेरिकेचे संरक्षण मंत्री लॉईड ऑस्टिन यांच्या उपस्थितीत संरक्षण मंत्र्यांची बैठक झाली. त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला. सागरी निगराणीतील भारताच्या नेतृत्वाचंही तिन्ही मंत्र्यांनी यावेळी कौतुक केलं.

**<><><><>**

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१७ नोव्हेंबर २०२४ - रविवार

इफ्फी म्हणजेच भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२४ साठी आंतरराष्ट्रीय परीक्षक मंडळाच्या अध्यक्षपदी चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माता आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा महोत्सव २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान गोव्यात आयोजित करण्यात आला आहे. आशुतोष गोवारीकर यांनी या नियुक्तीबाबत आनंद व्यक्त केला असून काळानुसार विकसित होणारा सिनेमा पाहण्यासाठी या महोत्सवापेक्षा दुसरी चांगली संधी नाही असं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महिलांच्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारताचा सामना आज जपान बरोबर होणार आहे. भारतीय महिला खेळाडूंनी आशयाई चॅम्पियन्स ट्रॉफी मध्ये विजयाची घोडदौड सुरू ठेवत चीन ला ३-० नं हरवून सलग चौथ्या वेळी विजय प्राप्त केला आहे. जपाननं मलेशियाला २-१ असं हरवून आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आपला पहिला विजय निश्चित केला आहे. बिहारमधील राजगीर मैदानावर संध्याकाळी ४ वाजून ४५ मिनिटांनी हा सामना सुरू होईल.

**<><><><><>**

राष्ट्रीय वरिष्ठ पुरुष हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत ओडिशाच्या शिलानंद लाक्रा यानं हॅट्ट्रिक साधत काल चेन्नई इथं झालेल्या अंतिम स्पर्धेत हरियाणाचा ५-१ असा पराभव करून ओडिशाला विजय मिळवून दिला. शिलानंदने तीन गोल केले, तर रजत आकाश तिर्की यानं सुरुवातीला मिळालेल्या संधीचं सोनं करून ओडिशाला आघाडी मिळवून दिली.

**//<><><><><>//**